2017

# आरसा

प्रा. विमुक्ता राजे

'आरसा' हा हवाहवासा वाटणारा. प्रत्येकाच्याच आयुष्यात कळत्या वयापासून आरशास एक विशिष्ट असं स्थान असतं. घरातील एखादा कोपरा व्यापणारा हा आरसा आपल्या अस्तित्वाची सर्वांनाच दखल घ्यायला लावतो. आरशा समोरुन जाता येता कुठल्याही वयातील स्त्री-पुरुष त्यात डोकावल्याशिवाय पुढे जातच नाही. आरशाची जादू इतकी की, भल्या-भल्यानांही त्याचा मोह सुटत नाही.

आरसा खरं तर नवीन असं काहीच निर्माण करीत नाही. कोणताही आरसा प्रतिमा किंवा छबी निर्माण करीत नाही. केवळ असलेल्या प्रतिमेचं दर्शन घडवतो. जे आहे ते जसेच्या तसे दाखवतो.

वेगळ्या संदर्भात असंही म्हणतां येईल की, काही राहून गेलं असेल तर त्याचीही आरसा आठवण करून देतो आणि चुकीचं किंवा विचित्र असेल तर सुधारायची संधीही आरसा देतो. पुढे जाऊन म्हणायचं तर जे खरं आहे सत्य आहे ते आरसा स्पष्टपणे सांगतो आणि दाखवतोही.

काही काही मंडळी मात्र स्वतःला हवं तसेच आरशात शोधण्याचा प्रयत्न करतात आणि रुचणारे नसेल ते टाळण्याकडे किंवा त्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करतात. परंतु आपले डोळे मिटून घेतले तरी सत्य लपत नाही. अशा वेळी सत्याला चुकवण्याचा प्रयत्न न करतां त्याला समोरे जाणे हेच श्रेयस्कर असते.

आरशाविषयी विचार करत असता आणखी एक गोष्ट मनात आली. जर 'गुणात्मक प्रतिमा दाखविणारा आरसा अवतरला... तर ... प्रत्यक्षात असा आरसा असू शकत नाही. हे जरी मान्य केलं तरी आपल्या कल्पनेनं तसा आरसा निर्माण करता येऊ शकतो.

अशी गुणात्मक प्रतिमा दाखवणारा आरसा आहे असे मानून... जमेल तितका वेळ त्याच्यासमोर निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि निग्रहाने उभे राहायला हवे. हे एकदा जमले की आत्मचिंतन, आत्मनिरीक्षणही जमू शकेल. स्वतःकडे त्रयस्थपणे पाहता येईल. आजवर स्वतःवर प्रेम करणारे आपण या आरशाद्वारे स्वतःचे दोषही पाहू शकतील.

साध्या आरशात दिसणाऱ्या रुपात जरी लक्षणीय बदल करता येत नसला तरी हा काल्पनिक आरसा आपल्या गुणात जाणवणारं आणि भावणारे परिवर्तन घडवू शकतो. दोषांची जाणिव झाली तर त्यांना दूर करण्याचा प्रयत्न होणारच. पुढे जाऊन गुणांचा संचय आणि संवर्धन निश्चित साधणारच!

व्यक्तिमत्वातले एकेक दोष गळून पडायला लागले म्हणजे अहंपणाही आपोआप नाहीसा होतो आणि आपण देवाच्या अधिक जवळ जातो. या देवाकडे एकच मागणं मागावसं वाटतं. या काल्पनिक गुणात्मक आरशात जाती, धर्म, भाषा, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत त्या सर्व प्रतिमा धूसर होऊ देत आणि आरशात माणुसकी लेवून असलेला निखळ 'माणूस' दिसू देत.

❀❀❀

# *"माय मराठी"*

काट्यांमधूनी तुडवित वाटा
माझी माय मराठी जगली।
फुले गळूनी निखळत गेली
पण तिची मुळं कधी ना झडली

वात्सल्य माऊलीचे पांघरुनी
पहाटे बकुळ गहिवरली
अंधारातूनी घडवित नवी पहाट
माझी माय मराठी फुलली

शिरावे एकदा तिच्या कुशीत
मायेची शाल ओढूनी,
जन्म घ्यावा मातीत या पुन्हा-पुन्हा
जणू दुधाच्या सायीवानी

वरदहस्तांना वंदन करुनी
कर माझेही पुनःश्च जुळती
म्हणूनच अशा या पावन भूमीत
माझी माय माय मराठी झळकती

मऱ्हाटमोळ्या हृदयात आतातरी
अभिजात देणे झेलूयात
जाता-जाता सुवर्णाक्षरांपरी
माझी माय मराठी कोरुयात.

प्रा. सौ. राजश्री जाधव

❀❀❀